उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अध्यापक महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक या पदाच्या सन २०१९ मधील बदल्यांबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०१९/प्र.क्र.८४/मशि-१
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०८ जुलै, २०१९

आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(५) मध्ये विहीत केलेल्या तरतूदीस अनुसरुन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय अध्यापक महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक संवर्गाच्या खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे परिणामस्वरूपत: (Resultant) बदल्या करण्यात येत आहेत.

अ. क्र.	सहाय्यक प्राध्यापकाचे नांव	विषय		सध्या कार्यरत असलेले महाविद्यालय	बदलीचे ठिकाण	शेरा
१	डॉ. रेखा उपाध्ये	इतिहास	pedagogy	शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ	शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा	विनंती
२	डॉ. विना लाडे	मराठी	pedagogy	शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा	शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ	प्रशासकीय
३	श्रीम. संजीवनी पैठणकर	इंग्रजी	perspective	शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई	शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल	विनंती
४	श्रीम. मिना भारती	भूगोल	perspective	शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल	शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई	विनंती

२. प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल. विनंती बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीने सदर बदल्या करण्यात येत आहेत.

४. बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता संबधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. आदेश तात्काळ अंमलात येतील.

२. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांच्या जागी पर्यायी प्राध्यापक हजर होण्याची वाट न पाहता संबंधित प्राचार्यांनी बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना बदलीच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित सहाय्यक प्राध्यापकांनी सध्या कार्यरत असलेल्या महाविद्यालयातून त्यांची बदली नंतरची पदस्थापना केलेल्या महाविद्यालयात तात्काळ रुजू व्हावे.

३. बदली झालेले सहाय्यक प्राध्यापक संबंधित महाविद्यालयाधून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखाद्या सहाय्यक प्राध्यापकास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरुन काम न करता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल.

४. पदस्थापनेत बदल करण्यासंबधीच्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही सहाय्यक प्राध्यापकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित सहाय्यक प्राध्यापक शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

५. बदली झालेल्या ठिकाणी रुजू होईपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येणार नाही.

६. सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे तसेच सदर आदेश तात्काळ अंमलात येत असल्याने बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त **दिनांक १५ जुलै, २०१९** पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या महाविद्यालयाने काढावे. त्यानंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या महाविद्यालयाकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित सहाय्यक प्राध्यापक बदलीच्या महाविद्यालयात रुजू झाल्यानंतर बदलीनंतरच्या महाविद्यालयाने काढावे. **दिनांक १६ जुलै, २०१९** पासूनचे वेतन बदलीपूर्वी कार्यरत असलेल्या महाविद्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरण्यात येईल.

७. बदली झालेल्या सहाय्यक प्राध्यापकांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची जबाबदारी वैयक्तिकरित्या सबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. याबाबतचा कार्यपालन अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसांत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०८१६३४०६१८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manisha Pravin Kini

Digitally signed by Manisha Pravin Kini
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=108cbdac08c7e940866a8fc97bfe7f861bf192ce9dd6b4d0924623149a51f9ed, cn=Manisha Pravin Kini
Date: 2019.07.08 16:39:30 +05'30'

(म. प्र. किणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२. संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
३. संबंधित प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालये
४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७. संबंधित सहाय्यक प्राध्यापक, शासकीय अध्यापक महाविद्यालये
८. निवड नस्ती.

प्रत :- १. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.